# Sitabai Arts, Commerce and Science College Akola

## NATIONAL SERVICE SCHEME

### Session 2021-2022

### 27/7/2021

मातृभूमि

## सीताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात रासेयो तर्फे वृक्षारोपण

**मातृभूमि वृत्तसेवा**

**। अकोला , दि. २७ ।**




येथील सीताबाई कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे अंतर्गत वृक्षारोपण संवर्धन आणि जनजागृती अभियानास प्रातिनिधिक स्वरूपाचे वृक्षाची लागवड महाविद्यालय परिसर येथे करुन सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी कडूनिंब, बेल, कडू बदाम, आवळा, अशोक, जांभूळ, बेहडा आणि सप्तपर्णी अशा ऑक्सिजन उत्सर्जित करणाऱ्या विविध वृक्षांची लागवड येत्या एका महिन्यात करण्यात येणार असून यामध्ये महाविद्यालयात एकूण १०० स्वयंसेवकांचे युनिट असून प्रत्येक स्वयंसेवक असे आपल्या गावातील परिसरात अथवा शेतात आणि महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी प्रत्येकी एक असे वृक्ष लागवड महाविद्यालय परिसर आणि विद्यार्थ्यांच्या गावांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना द्वारे लावण्याचा मानस महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष रूपचंद अग्रवाल यांच्या मार्गदर्शनात तसेच प्राचार्य डॉ.आर. डी.सिकची यांच्या नेतृत्वात आणि कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल गावंडे व सहकार्य क्रम अधिकारी प्रा. सुनिता बन्ने यांच्या प्रत्यक्ष संकल्पनेने राबविण्यात येणार आहे.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी.एस वजीरे यांनी पर्यावरणाच्या संतुलनासाठी वृक्ष लागवडीची गरज विशद करत या कार्यक्रमांमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याने प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी ने उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन वसुंधरेला वाचण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना सर्वतोपरी सहकार्य करावे असे आवाहन याप्रसंगी केले. कार्यक्रमाला दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माननीय ॲड मोतीसिंह मोहता वरिष्ठ उपाध्यक्ष विजयकुमार तोष्णीवाल कनिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र जैन मानद सचिव पवन कुमार माहेश्वरी सचिव. इंजि. अभिजीत परांजपे व समस्त कार्यकारी सदस्यांनी शुभेच्छा देऊन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचा व विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवला.

Akola city Edition
Jul 28, 2021 Page No. 1
epaper.dailymatrubhumi.com

On the 27 July 2021 Tree plantation program was organized by volunteers of NSS. On the occasion, Each student was given a tree to adopt. Thus various trees were planted in the premises of colleges and adopted village volunteers of NSS we are present in great numbers.

- **To save the earth**
- **Raising the water level through trees**
- **T=4,S =23**

## Sitabai Arts, Commerce and Science College Akola

## NATIONAL SERVICE SCHEME

## Session 2021-2022

## Sitabai College of Arts, Commerce and Science carried "Gandagi Mukta Bharat Abhiyan" from 8th August to 15th August in the college premises.





During the week-long Dirt Free India Campaign, the college premises, library, classrooms were cleaned and disinfected as well as trees were planted and waste plastic was collected and disposed off in the college area. Dr. R D Sikchi, Principal, Sitabai College of Arts, Commerce and Science and Mr. Rupchandji Agrawal, Chairman, College Development Committee was present as the Chief Guest on this occasion and Roopchand Ji Agarwal guided the students and swore an oath of cleanliness. Cleanliness of various departments of the college under the Dirt free India campaign. Among them, cleanliness drive was implemented in library, Administrative department, Garden, parking lot. Students of National Service Scheme as well as N.S.S. program Officer Prof. Amol Gawande and Mrs. Sunita Banne, Dr. Wazire, Dr. Aniruddha Khare, Dr. Keswani,Dr.Ashok Sononwane,Dr.Prasatrajit Gawai, Prof.Prashant Thakre as well as administrative staff Mr. Nilkanth Ingle, teachers and non-teaching staff were present. Mrs. Sunita Banne expressed her gratitude for the program. Harshadip Sadanshiv,Indrajit Ingle, Amol Shende,Shubham Wnkhade, Roshan Ingle, Kartik Sawant,Pranav Ambhore, Krishna Tayde, Manish Ingle, Prashant Karskar, Swapnil Tayde, Kartik Dhokne, Gajanan Kale, Sheikh Rajik, Sheikh Mudassir, Mangesh, Hershal Dhadse, Abhay Dandi, Avinash Ambhore, Aniket Khandare, Akash Khandare, Prafulla Avchar, Himmat Pachpore, Krishna Kadu NSS Students, teachers and non-teaching staff worked hard to make the program a success.

- **Gandagi Mukt Bharat**
- **Social Awareness**
- **T=2 ,S =39**

# Sitabai Arts, Commerce and Science College Akola

# NATIONAL SERVICE SCHEME

## Session 2021-2022

## Azadi ka Amrit Mahotsaw

**13/08/2021**

मातृभूमि

### 'फिट इंडिया फ्रीडम रन' उपक्रमाला सुरुवात

**मातृभूमि वृत्तसेवा**

**। अकोला, दि. १८।**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली व नेहरू युवा केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना सीताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने आजादी का अमृत महोत्सव कार्यक्रमाचे उद्घाटन संपन्न झाले.

या कार्यक्रमा करीता केंद्र शासनाकडून १९३८ साली स्थापन झालेल्या सीताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला निवड करण्यात आली होती. नेहरू युवा केंद्र अंतर्गत आजादी का अमृत महोत्सव येत्या तीन वर्षात विविध उपक्रम राबवण्यात येणार आहे. ७५ ग्रामीण विभागांमध्ये येत्या काही दिवसात कोरोना नियमाची दखल घेऊन कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. आज या कार्यक्रमाची सुरुवात अकोल्यातील स्वातंत्र्यपूर्व १९३८ आली स्थापन झालेल्या सीताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयतून ध्वजवंदन तसेच राष्ट्रगीता गायनासह, फिट इंडिया फ्रीडम रन ची शपथ घेण्यात आली तसेच प्राचार्य डॉक्टर आर डी सीकची व महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष श्री रूपचंद अग्रवाल यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून फिट इंडिया फ्रीडम रन ; या या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहे ज्यामध्ये निबंध स्पर्धा, ऑनलाइन प्रश्नमंजुषा, सायकल रॅली यासारखे कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. सदर




कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. आर. डी.सीकची व रूपचंद अग्रवाल, महेश शेखावत, देशमुख, जिल्हा क्रीडा अधिकारी आसाराम जाधव, एन सी सी चे प्रमुख कर्नल पांडे, शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी व एन सी सी चे विद्यार्थी यांची उपस्थिती लाभली. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.अमोल गावंडे, क्रीडा अधिकारी प्रा.प्रशांत ठाकरे, एनसीसी कार्यक्रम अधिकारी डॉ.नरेटी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक तसेच एन सी सी च्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता परिश्रम घेतले.




Akola city Edition
Aug 19, 2021 Page No. 2
epaper.dailymatrubhumi.com

Under the guidance of the Central Government and in association with Nehru Youth Center and National Service Scheme Sitabai College of Arts, Commerce and Science, the inauguration of the Azadi Ka Amrit Mahotsav program was concluded.

Sitabai College of Arts, Commerce and Science, Akola, established in 1938 in Akola district, was selected for this program. Azadi Ka Amrit Mahotsav will be implemented under Nehru Yuva Kendra in the next three years. After hoisting the flag and singing the national anthem in the college, the Fit India Freedom Run oath was taken. The initiative was flagged off by Shri Roopchand Agarwal, President of the College Development Committee. Principal RD Sikchi, Roop Chand Aggarwal, Mahesh Shekhawat, District Sports Officer Asaram Jadhav, Head of NCC Colonel Shri Pandey, teaching staff of the college, non-teaching staff, students and National Service Yojana volunteers were present in large numbers.

- **Organized program to inspire students on the occasion of Amrit Mahotsav of Independence**
- **T= all staff; S=100NSS; Other S =350**

**Sitabai Arts, Commerce and Science College Akola**

**NATIONAL SERVICE SCHEME**

**Session 2021-2022**

**A Programme of Establishment of NSS**

महाराष्ट्रातील एकमेव स्वतंत्र दैनिक
अजिंक्य भारत

Sept. 25, 2021

# सीताबाई महाविद्यालयात रासेयो स्थापना दिन साजरा



**अकोला, दि. २४ प्रतिनिधी** येथील सीताबाई कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथक व ग्रीन ऑडिट अंतर्गत २४ सप्टेंबर राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला.

मानवी जीवन जगताना मानव सेवा हीच ईश्वर सेवा असा मंत्र देणारा घटक म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्र निर्मितीत महत्वाची भूमिका बजावणारा तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकी विज्ञानातून विकासाकडे जाण्याचा महामंत्र देणारे ठिकाण, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, कौशल्याला, सुप्त गुणांना व्यासपीठ निर्माण करणारे ठिकाण, समाज सेवेतून राष्ट्रप्रेम व व्यक्तिमत्व विकास सांगणारे ठिकाण म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना ही होय. २४ सप्टेंबर राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर डी सिकची तसेच महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष रूपचंदजी अग्रवाल यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

या प्रसंगी महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष रूपचंदजी अग्रवाल यांनी मनुष्य जीवन जगतांना राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व विशद केले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.डि.सिकची यांनी पर्यावरणाच्या संतुलनासाठी वृक्ष लागवडीची गरज विद्यार्थांना पटवून दिली. या स्थापना दिवस कार्यक्रमाला मराठी विभाग प्रमुख प्रा.भास्कर धारणे, डॉ.कैलास वानखेडे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रसन्नजीत गवई, डॉ.ज्ञानशिल खंडेराव, डॉ.बाळासाहेब जोगदंड, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.अमोल गावंडे सह कार्यक्रम अधिकारी सौ. सुनीता बन्ने यांची उपस्थिती लाभली होती. राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस कार्यक्रमाला दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माननीय अँड मोतीसिंहजी मोहता वरिष्ठ उपाध्यक्ष विजयकुमार तोष्णीवाल कनिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र जैन मानद सचिव श्री पवन कुमार माहेश्वरी सचिव. इंजि. अभिजीत परांजपे व समस्त माननीय कार्यकारी सदस्यांनी शुभेच्छा देऊन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचा व विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवला.वृक्षारोपण कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता डॉ. ज्ञानशिल खंडेराव,रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.अमोल गावंडे, सौ. सुनीता बन्ने प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी श्री गजानन कळंबे तसेच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता परिश्रम घेतले.

On 24th September 2019 a programme of establishment of NSS was organized in the college. On the occasion of the Foundation Day of National Service Scheme, trees were planted in the premises of colleges and adopted village volunteers of NSS we are present in great numbers.

- **To save the earth**
- **Raising the water level through trees**
- **T=8,S =27**

# Sitabai Arts, Commerce and Science College Akola

## NATIONAL SERVICE SCHEME

## Session 2021-2022

### Covid Vaccination Awareness Campaign by Sitabai Arts Commerce and Science College Akola
### 02/10/2021

---




**सीताबाई कला व विज्ञान महाविद्यालयतर्फे कोविड लसीकरण जनजागृती मोहीम**

**अकोला, दि. ५ प्रतिनिधी**

स्थानिक सीताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व एनसीसी या दोनही विभागाच्यावतीने, राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री या दोन महामानवांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून, कोविड लसीकरण व जनजागृती मोहिम राबविण्यात आली. शनिवार दि. २ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांकरीता तसेच इतर नागरिकांकरिता अकोला जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय सामान्य रुग्णालय अकोला व सीताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने लसीकरण मोहीम चे आयोजन करण्यात आले होते.सोबतच महाविद्यालयावर विद्यार्थ्यां तर्फे परिसरामध्ये कोविड लसीकरण संदर्भात जनजागृती करण्यात आली. या लसीकरण मोहिमेला विद्यार्थी सह समाजातील इतर नागरिकांचा प्रतिसाद लाभला होता. या कार्यक्रमाला अकोला जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय सामान्य रुग्णालय अकोला येथील डॉक्टर तसेच सेवा कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.डी.सीकची, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल गावंडे प्रा. सुनीता बन्ने, एन सी सी प्रमुख डॉ. हरिश्चंद्र नरेटी, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रसन्नजीत गवई उपस्थित होते.

On the occasion of the birth anniversary of the two great men, Father of the Nation Mahatma Gandhi and Lal Bahadur Shastri, a covid Vaccination Awareness Campaign was implemented by the National Service Scheme Department here. This privatization campaign was well received by the students and other citizens of the society. The program received special support from Akola District Surgeon Office General Hospital Akola

- **Covid Vaccination Awareness Campaign on Mahatma Gandhi's Birth Anniversary**
- **T= all staff; S=53**

**Sitabai Arts, Commerce and Science College Akola**

**NATIONAL SERVICE SCHEME**

**Session 2021-2022**





Greeting program On the occasion of the birth anniversary of the two Great men, Father of the Nation Mahatma Gandhi and Lal Bahadur Shastri

- **Celebrating Azadi ka Amrit Mahotsav**
- **T=ALL,S=72**

# Sitabai Arts, Commerce and Science College Akola

## NATIONAL SERVICE SCHEME

## Session 2021-2022










**Prof. Amol W. Gawande and Prof. Sunita Banne, National Service Scheme Program Officer of the college attended the three-day** Training Programme on Mainstreaming of DRR in Education Sector **from 11/10/21 to 13/10/21**.This program IN COLLABORATION WITH NDMA, GoI AND DM & R&R DEPT. GOM CONDUCTED CAPACITY BUILDING TRAINING FOR DISTRICT OFFICIALS UNDER NCRMP PHASE II COMPONENT C

- **Students and society should be aware of disaster management**
- **T=2**

# Sitabai Arts, Commerce and Science College Akola
# NATIONAL SERVICE SCHEME
# Session 2021-2022
# Covid-19 vaccination camp 01-11-2021

मातृभूमि

## एस.ए. महाविद्यालय लसीकरण शिबिराला प्रतिसाद

मातृभूमि वृत्तसेवा

। अकोला, दि. २ ।



दि. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी अकोला द्वारा संचलित सीताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना व एन.सी.सी विभाग आणि अकोला महानगरपालिका (युवा स्वास्थ्य मिशन) तसेच शल्य चिकित्सक कार्यालय जिल्हा सामान्य रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमानाने कोविड -१९ लसीकरण शिबिराचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. दि. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अ‍ॅड. एम.जी मोहता, मानद सचिव पवनकुमार माहेश्वरी, वरिष्ठ उपाध्यक्ष विजयकुमार तोष्णीवाल, कनिष्ठ उपाध्यक्ष डॉ. श्री. रवींद्र जैन, महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष रूपचंद अग्रवाल (बाबूजी), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राधेश्याम सिकची यांच्या मार्गदर्शनाखाली व रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी प्रा.ए.डब्ल्यू गावंडे, प्रा. सुनिता बन्ने, प्रा.रुचि भारुका, प्रा.प्रिती कोठारी, एन.सी.सी अधिकारी डॉ. हरिश्चंद्र नरेटी यांच्या नेतृत्वात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या लसीकरणाच्या माध्यमातून महाविद्यालयाच्या एकूण ९३ विद्यार्थ्यांनी लसीकरण करून घेतले. ज्यामध्ये प्रथम डोज घेणारे ८१ व द्वितीय डोज घेणारे १२ विद्यार्थी सहभागी झाले होते. या शिबिराला मनपाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अनुप चौधरी, जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या नोडल अधिकारी डॉ. मिना शिवाल, वैद्यकीय अधिकारी डॉ. चितलांगे, डॉ.तासखेडीकर, बोलटक्के, शेवत, राठोड, अर्चना ठोसरे, विजया जाधव, आकाश पवार इत्यादींनी लसीकरणा करिता वैद्यकीय सहकार्य केले.

या शिबिराला चंद्रप्रकाश बडोला, डॉ. अनिरुद्ध खरे, प्रा. भास्कर धारणे, डॉ. भास्कर वजीरे, डॉ. प्रसन्नजीत गवई, डॉ.अण्णासाहेब दामोदर, डॉ. सुरेश केसवानी, प्रा.नाना भडके, डॉ. उमेश चापके, ग्रंथपाल डॉ. अशोक सोनोने आदी उपस्थिती होते. यशस्वितेकरिता एनसीसी कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल गावंडे, एनसीसी अधिकारी डॉ.प्रा. हरिश्चंद्र नरेटी व एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

Akola city Edition
Nov 3, 2021 Page No. 1
epaper.dailymatrubhumi.com

Vaccination camp held at Sitabai Arts, commerce and science College. The National Service Scheme, NCC Department of Sitabai College of Arts, Commerce and Science college conducted by The Berar General Education Society Akola in association with Municipal Youth Health Mission and Civil Surgeon's Office District General Hospital organized the Covid-19 Vaccination Camp in the college under the chairmanship of Advocate M.G Mohta,. Honorary Secretary Pawan Kumar Maheshwari, Senior Vice President Vijaykumar Toshniwal, Junior Vice President Dr. Ravindra Jain, College Development Committee President Rupchand Agarwal, Principal Dr. Radhesham Sikchi. Under the guidance of N S S Program Officer Prof. A W Gawande Professor Sunita Banne, The camp was organized under the leadership of Ruchi Bhagat, Prof. Preeti Kothari, NCC officer Dr. Harishchandra Nareti. A total of 93 students of the college got vaccinated through this vaccination. Municipal Medical Officer Dr. Anup Choudhary, District General Hospital Nodal Officer Dr. Meena Shival, Medical Officer Dr. Chitlange, Dr. Taskhedekar, Boltakke, Shewat, Rathod, Archana Thosare, Vijaya Jadhav, Akash Pawar etc. provided medical support for vaccination in this camp. Chandra Prakash Bhadola, Dr.Anirudh Khare, Professor Bhaskar Dharne, Dr. Bhaskar Wajire, Dr. Prasannajit Gavai, Dr. Annasaheb Damodar, Dr. Suresh Keswani, Professor Nana Bhadke, Dr. Umesh Chapke, Librarian Dr. Ashok Sonwane and others were present in this camp. NCC Program Officer Dr. Harishchandra Nareti and NSS Program Officer Prof. Amol Gawande and NCC students worked hard for success.

- **T= all; S=93; staff Government Hospital Akola**
- **Reducing the spread of the pandemic and further reducing the associated disease and deaths**

# Sitabai Arts, Commerce and Science College Akola
# NATIONAL SERVICE SCHEME
# Session 2021-2022
# "Constitution Day" held at Sitabai College of Arts, Commerce and Science.

मातृभूमि

**शहिदांना श्रद्धांजली : ७५ हजार संविधान उद्देशिकांचे केले वितरण**

## सीताबाई महाविद्यालयात संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन

मातृभूमि वृत्तसेवा

। अकोला , दि. २ ।

स्थानिक सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त कोरोना नियमाचे पालन करुन महाविद्यालय परिसरात असंख्य विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये संविधान उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.




बि.जे.ई. सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मोतीसिंह मोहता, मानद सचिव पवनकुमार माहेश्वरी यांच्या प्रेरणेने तसेच महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रूपचंद अग्रवाल व महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. राधेश्याम सिकची यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत संविधान दिन कार्यक्रम २६ नोव्हेंबर रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमामध्ये संविधान उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच २६/११ रोजीच्या भ्याड हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या सैनिकांना यावेळी सामुहिक श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. राधेश्याम सिकची यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेच्या वाचनाला सुरुवात केली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगिताने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कैलास वानखडे यांनी तर आभार राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. अमोल गावंडे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील डॉ. अनिरुद्ध खरे, डॉ. बी एस वजीरे, डॉ. सुरेश केसवाणी डॉ. कैलास वानखडे, डॉ. निरज लांडे, डॉ. अशोक सोनवणे, डॉ. सुनील गायगोळ, डॉ. अजय सोळंके, डॉ. संतोष कुलकर्णी, प्रा. नाना भडके, डॉ.बाळासाहेब जोगदंड, डॉ. स्नेहल शेंबेकर, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. अमोल गावंडे, प्रा.सुनिता बन्ने, प्रा. प्रीती कोठारी प्रा. रुची भारूका, प्रा. प्रमोद मार्कंडे प्रा. प्रशांत ठाकरे श्री नीलकंठ इंगळे, सौ.रंजनाताई टाले तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. अकोला जिल्हा प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या वतीने भारताच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवानिमित्त संविधान दिन २६ नोव्हेंबर रोजी ७५००० संविधान उद्देशिका वितरण व वाचन कार्यक्रमांमध्ये सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे एन.एस.एस व एन.सी.सीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

Akola city Edition
Dec 3, 2021 Page No. 1
epaper.dailymatrubhumi.com

"Constitution Day" was celebrated under the National Service Scheme in the college premises with all the precautions of covid 19 epidemic. The event was followed by a collective reading of the preamble of the Indian constitution. Tribute was paid to the soldiers who were martyred in the cowardly attack on 26/11. On this occasion, Dr.R.D.Sikchi read out the Objectives of the Constitution of India and explained the importance of the program. The program concluded with the National Anthem. Dr. Prasannajit Gavai, conducted the program while professor Amol Gawande the National Service Program Officer proposed vote of thanks. Dr.Aniruddha Khare Dr. B S Wazire Dr. Suresh Keswani, Dr. Kailash Wankhade, Dr. Niraj Lande, Dr. Ashok Sonawane, Dr. Sunil Gaigol, Dr.Ajay Solanke, Dr.Santosh Kulkarni, Prof. Nana Bhadke, Dr. Balasaheb Jogdand, Dr.Snehal Shenbecker, Dr.Bharti Patnaik, Dr.Kaumudini Barde, Prof. Sarika Heda, Dr. Vedanjali Kale, prof. Bhaskar Dharane, Dr. Govind Elalkar, Dr. Annasaheb Damodar, Dr. Umesh Chapke,Prof. Dilip Kumre, Dr. Harishchandra Nareti National Service program Officer Prof. Amol Gawande Prof. Pramod Markande Prof. Prashant Thakre, Shri Neelkanth Ingle, Shri Mahadev Solanke, Shri Bharat Lohakpure,Shri Nakul God, Shri Prashant Dinonde, Shri Shubham Poul, Shri Ganesh Jhatale, Shri Kailas Amritkar, Shri Gajanan Kalambe, Shri Ashwin Rakesh, Shri. Raju Sonawane, Shri Jamnik, Shri Kiran Patekhele, Mrs. Ranjanatai Tale as well as teachers and non-teaching staff students of Rashtriya Seva Yojana were present.

- **Importance of Indian Constitution / Social Awareness of Indian Constitution**
- **T=ALL ,S =273**

# Sitabai Arts, Commerce and Science College Akola
## NATIONAL SERVICE SCHEME
## Session 2021-2022
## Blood Donation Camp Organized By National Service Scheme



# सीताबाई महाविद्यालयातील ३६ विद्यार्थ्यांनी रक्तदान करुन केले महामानवांना अभिवादन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**अकोला** ■ शहरातील सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त तसेच वैराग्यमुर्ती संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त राष्ट्रीय सेवा योजना व एनसीसी विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित रक्तदान शिबिरात ३६ विद्यार्थ्यांनी रक्तदान करुन या महामानवांना अभिवादन केले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन व अंधश्रद्धा आणि अस्वच्छता यांनी बुरसटलेल्या समाजाला भजन व किर्तनासारख्या माध्यमाने समाज सुधारणा व समाज प्रबोधन करणारे वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून या दोन महामानवाला अभिवादन करण्याच्यादृष्टीने सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बीजीई सोसायटीचे अध्यक्ष ॲड.मोतीसिंह मोहता, मानद सचिव पवनकुमार माहेश्वरी यांच्या प्रेरणेने तसेच महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष

### एनएसएस- एनसीसीचा संयुक्त उपक्रम

रुपचंद अग्रवाल व प्राचार्य डॉ. राधेश्याम सिकची यांच्या मार्गदर्शनात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.अमोल गावंडे व एनसीसी प्रमुख डॉ. हरिश्चंद्र नरेटी यांच्या नेतृत्वात राष्ट्रीय सेवा योजना व एनसीसी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न झाले. या रक्तदान शिबिराच्या यशस्वितेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल गावंडे, एनसीसी अधिकारी डॉ. हरिश्चंद्र नरेटी, प्रा. प्रीती कोठारी, प्रा.रुची भारुका, महाविद्यालयाचे अधीक्षक निळकंठ इंगळे, शासकीय रुग्णालयातील रक्तपेढीच्या डॉ. ठाकरे, डॉ. तायडे मॅडम यांचे सहकार्य लाभले. तसेच एन.सी.सी व एन.एस.एस स्वयंसेवक हर्षवर्धन सदाशिव, इंद्रजीत इंगळे, अमोल शिंदे, एनसीसी कॅडेट एस.यु.ओ. प्रशांत करस्कर, जेयुओ विकास तेलगोटे, एसआरजीटी क्रिष्णा कडू, गजानन कडंबे यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

या शिबिराला रासेयो व एनसीसी आणि महाविद्यालयातील इतर एकूण ३६ विद्यार्थ्यांनी रक्तदान पूर्ण केले. या भव्य रक्तदान शिबिराला एनसीसी बटालियन अधिकारी सुभेदार विनोदकुमार, सुभेदार जयपाल, हवालदार श्याम पुन, सुभेदार मनोहरलाल व महाविद्यालयातील सर्व विभागांच्या प्रमुखांनी सदिच्छा भेट दिली.

ePaper देशोन्नती Fri, 24 December 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/65163742

Blood Donation Camp was Organized By National Service Scheme in Sitabai Arts, Commerce and Science College. Dr. Tayade of The General Hospital facilitated the President of the College Development Committee Rupchandji Agrawal and the Principal Dr. R.D Sikchi as well as Dr. H.N Nareti and National Service Scheme Officer Amol Gawande. Under the guidance of the Principal Dr.R.D Sikchi, blood donation camp was organised by National Service Scheme. Due to the pandemic situation of Corona the aim is to overcome the chronic shortage of the blood which is being treated in the wake of the Corona epidemic. Prof.Amol Gawande nurtured his commitment by organizing blood donation camps. Total 36 donors donated blood and expressed their gratitude to the Corona Warriors. Harshadip Sadanshiv,Indrajit Ingle, Amol Shende,Shubham Wnkhade, Roshan Ingle, Kartik Sawant,Pranav Ambhore, Krishna Tayde, Manish Ingle, Prashant Karskar, Swapnil Tayde, Kartik Dhokne, Gajanan Kale, Sheikh Rajik, Sheikh Mudassir, Mangesh, Hershal Dhadse, Abhay Dandi, Avinash Ambhore, Aniket Khandare, Akash Khandare, Prafulla Avchar, Himmat Pachpore, Krishna Kadu along with college staff Kailas Amritkar donated blood. All the NSS students, professors, non-teaching staff were present for the success of the camp.

- **Importance of blood donation, Social Awareness, T-16;S-59**

# Sitabai Arts, Commerce and Science College Akola

## NATIONAL SERVICE SCHEME

## Session 2021-2022

### The Birth Anniversary Of Great Men Should Not Only Be Celebrated But Also Inspired By Their Works


दैनिक जनमाध्यम

• अकोला, बुधवार ५ जानेवारी २०२१ एक प्रतिष्ठित सवय


## महापुरुषांची जयंती फक्त साजरी न करता त्यांच्या कार्याची प्रेरणा घेतली पाहिजे : प्राचार्य डॉ. सिकची

### सीताबाई महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

■ प्रतिनिधी । अकोला ■

शहरातील सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना व वुमेन्स सेल यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.डी.सिकची यांनी विचार व्यक्त करतांना देशातील महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथी फक्त साजरी न करता त्यांनी केलेल्या कार्याची प्रेरणा अंगिकारायला पाहिजे. असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रसन्नजीत गवई यांनी केले. या कार्यक्रमाला रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. डबू. गावंडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. शेंबेकर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.अण्णासाहेब दामोदर, डॉ.बाळासाहेब जोगदंड, हिंदी विभाग प्रमुख डॉ. केसवानी, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ.सुनील गायगोल, प्रा.दिलीप वुःमरे, प्रा.प्रमोद मारकंडे डॉ.संतोष कुलकर्णी, संगीत विभाग प्रमुख डॉ. अनिरुद्ध खरे, डॉ.गोविंद एललकार, डॉ.निरज लांडे, डॉ.उमेश चापके, प्रा.नाना भडके, डॉ.अजय सोंळके, मराठी विभाग प्रमुख प्रा. भास्कर धारणे, डॉ. कैलास वानखडे, डॉ. ज्ञानशील खंडेराव, डॉ. अशोक सोनवणे प्रा.डाबेराव, निळकंठ इंगळे तसेच प्रा.प्रशांत ठाकरे यांच्यासह महिला प्राध्यापिका प्रिती चापके, नेहा फाफटली, दिक्षा पानपाडीया, वंदना दिवरे, संगीता बजाज, कोमल श्रीवास, अर्चना बोंडे, त्रिशला खांडेकर, मनीषा कांबळे, नूतन शर्मा, दिपाली शहा, मेघा नायसे, राधा गुप्ता, दीप कणकेकर, एनसीसी विभाग प्रमुख डॉ. हरिश्चंद्र नरेटी व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल गावंडे व प्रा. सुनीता बन्ने, प्रा.रूची भारुका तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व एनसीसीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




The birth anniversary of Krantijyoti Savitribai Phule was celebrated with great enthusiasm in Sitabai College.On the occasion, the principal of the college, while guiding the students, said that they should not only celebrate the birth anniversary of great men but should take inspiration from their work.The program was attended by teachers and students of National Service Scheme in large numbers.

- **For spreading the thought of Savitribai Phule**
- **T=ALL ,S =62**

# Sitabai Arts, Commerce and Science College Akola

## NATIONAL SERVICE SCHEME

## Session 2021-2022

### The Birth Anniversary of Swami Vivekananda And Rashtramata Jijau Was Celebrated With Enthusiasm In Sitabai College

पश्चिम विदर्भात सर्वाधिक प्रसारित दैनिक Email: rajyonnati@gmail.com

**राज्योन्नती**

अकोला ♦ वर्ष ८ ♦ अंक १०३ ♦ रविवार/ १६ जानेवारी २०२२

# स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती सीताबाई महाविद्यालयात उत्साहात साजरी

**प्रतिनिधी/ १५ जानेवारी**

**अकोला:** स्थानिक सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्वामी विवेकानंद आणि राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. दि. बि.जे.ई. सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मोतीसिंह मोहता, मानद सचिव पवनकुमार माहेश्वरी यांच्या प्रेरणेने तसेच महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रूपचंद अग्रवाल व प्राचार्य डॉ. राधेश्याम सिकची यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमानाने बुधवारी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती कोरोनाच्या नियमाचे पालन करुन साजरी करण्यात आली. या कार्यक्रमामध्ये डॉ.




ज्ञानशील खंडेराव यांनी उपदेशपर मार्गदर्शन करताना स्वराज्यासाठी बलिदान दिलेल्या रक्ताचे महत्व आजच्या युवा पिढीने प्रेरणा म्हणून स्वीकारावे या प्रेरणेतून किमान वर्षा मध्ये एकदा असे आपण दरवर्षी रक्तदान करून सामाजिक ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न करावा, या प्रकारचे कार्यक्रम आपण साजरे करून युवक दिन साजरा करावा असे आव्हान केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल गावंडे, सौ सुनीता बन्ने, व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. स्नेहल शेंबेकर, डॉ. ज्ञानशील खंडेराव, डॉ.नीरज लांडे, प्रा.नानासाहेब भडके, प्रा.रूची भारूका, प्रा.प्रीती कोठारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी राकेश अश्विनी, विजय तिवारी, सुभाष चैरवाल यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता परिश्रम घेतले.

The birth anniversary of Swami Vivekananda and Rashtramata Jijau was celebrated enthusiastically in Sitaphal College. College students and teachers attend these programs in large numbers. On the occasion, the Principal guided the students by highlighting the work of Swami Vivekananda and Rashtramata Jijau

- **For spreading the thought of Swami Vivekananda and Rashtramata Jijau**
- **T=6 ,S =34**

# Sitabai Arts, Commerce and Science College Akola

## NATIONAL SERVICE SCHEME

## Session 2021-2022

### Lecture on Voter's Day at Sitabai College

मातृभूमि

# सीताबाई महाविद्यालयात मतदार दिनानिमित्त व्याख्यान

**मातृभूमि वृत्तसेवा**

**। अकोला, दि. २९ ।**




